महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
रविवार दि. ८ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३५
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










# इराण-इस्रायलच्या युद्धाचा भडका!

मुंबई । वृत्तसेवा

**अमेरिका-इस्त्रायल आणि इराण संघर्षाचे पडसाद आता जगासह भारताच्या बाजारपेठांत उमटताना दिसत आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी करताच कच्चा तेल सह एलपीजीचे दर भडकले आहेत. याचा थेट परिणाम भारतात होताना दिसत असून केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठ्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे.**

## ▶ हॉटेल, रेस्टॉरंटचा गॅस पुरवठा केंद्राने रोखला?

## ▶ घरगुतीसह कमर्शियल सिलिंडर महागला

सरकारने व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबविला आहे. यामुळे देशभरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्री उद्योग ठप्प होण्याची भीती आहे. तसेच यादरम्यान सर्व सामान्यांच्या खिशाला देखील इराण-इस्रायल संघर्षाची झळ बसली असून घरघुती गॅस सिलिंडरच्या किंमती ६० रूपयांनी भडकल्या आहेत. यामुळे ८६० रुपयांना मिळणारं सिलिंडरसाठी महाराष्ट्रात ९२० रुपये मोजावे लागणार आहेत. १४.२ किलोच्या घरघुती गॅस सिलेंडरसाठी नवे दर आजपासून लागू झाले आहेत. तर व्यावसायिक १९ किलो सिलेंडरच्या किमतीत ११५ रुपयांची वाढ झाली आहे. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात युद्धामुळे दिवसागणिक संघर्ष वाढत आहे. या मात्र संघर्षामुळं प्रत्यक्ष युद्धात सहभागी नसलेल्या देशांना याचा परिणाम सोसावे लागत आहेत. जगासमोर कच्चा तेल एलपीजीच्या पुरवठ्याचं नवं संकट निर्माण झालं आहे. तर या युद्धाची झळ आता थेट भारतालाही बसताना दिसत आहे. इराण-इस्रायल संघर्षात इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करत थेट तेल आणि एलपीजी वाहतूक



करणाऱ्या जहाजांना लक्ष करू असा इशारा दिला आहे. यामुळे एलपीजी टँकरची वाहतूक विस्कळीत झाली असून भारतात याचे परिणाम आता पाहायला मिळत आहेत. भारत याच होर्मुझ सामुद्रधुनीतून आपल्या वापराच्या ८० टक्क्यांहून तेल आणि एलपीजी आयात करतो. पण आता होर्मुझ सामुद्रधुनीतून तेल आणि एलपीजीची होणारी आयात ठप्प झाली आहे. यामुळे या पार्श्वभूमीवर नागरिकांना घरगुती गॅस आणि हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्री उद्योगाच्या एलपीजीच्या पुरवठ्याबाबत केंद्र सरकारला मोठं पाऊल उचलावं लागलं आहे. घरगुती गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून खबरदारीचा उपाय म्हणून केंद्र सरकारने तातडीने सर्व रिफायनरी यांना एलपीजीचं उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे रिफायनरी कंपन्या त्यांच्याकडील प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर फक्त स्वयंपाकाचा गॅस बनवण्यासाठी करतील. मात्र आत्ताच्या घडीला घरघुती गॅस सिलिंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ सरकारने केली आहे. परिणामी राज्यात ▶▶ पान २ वर

# ‘स्वाराती’ला सरकारचे बळ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, संस्थेच्या इमारतींच्या एकत्री करणासाठी आणि विस्तारासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. राज्यातील ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपैकी नव्याने मान्यता मिळालेल्या ११ महाविद्यालयांची बांधकामे सध्या प्रगतीपथावर आहेत. ▶▶ पान २ वर

## गेवराई मतदार संघातील विकास कामांना

# ७२ कोटीचा निधी मंजुर

गेवराई । प्रतिनिधी

यंदाच्या अर्थसंकल्पात गेवराई विधानसभा मतदार संघातील ७२ कोटी १६ लक्ष रुपये किंमतीच्या विविध विकास कामांना निधीची तरतुद झाली आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे विधानसभा निवडणुक दरम्यान दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने होत आहे. रस्ते, इमारत बांधकाम यांसह सिंचन विषयक कामांचा यामध्ये समावेश आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिणी पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, संबंधित विभागांचे मंत्री आणि महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहे. गेवराई विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांना मंजुरीसह निधीची उपलब्धता व्हावी यासाठी आ.



विजयसिंह पंडित सातत्याने प्रयत्नशील आहेत. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे यंदाच्या अर्थसंकल्पात गेवराई विधानसभा मतदार संघातील ७२ कोटी १६ लक्ष रुपये किंमतीच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. सिंदफणा नदीवरील टाकळगाव बॅरेज बांधकामासाठी १९.६६ कोटी रुपये, गेवराई शहरातील न्यायालयीन इमारतीवर पहिल्या मजल्यासह ४ कोर्ट रुम बांधकामासाठी १० कोटी रुपये, घोसापूरी, ता.बीड येथे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय बांधकामासाठी १२.५१ कोटी रुपये, नाबार्ड अंतर्गत सिरसदेवी ते काजळ्याचीवाडी रस्त्यावरील पुलाचे बांधकामासाठी १.९७ कोटी रुपये, लिंबारुई ते पाटेगाव रस्त्यावरील पुलाच्या बांधकामासाठी ९९ लक्ष रुपये, भाटसांगवी-बऱ्हाणपूर ते वाकनाथपूर रस्त्यावर व्हेंटेड कॉजवे बांधकाम करण्यासाठी ▶▶ पान २ वर

# रस्त्यांच्या सुधारणेसाठी २५ कोटींच्या निधीची तरतूद

## आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज मतदार संघातील दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय नियोजनात केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील दोन प्रमुख रस्ते कामांसाठी २५ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावित कामांनुसार धारूर, तांदळवाडी, उंदरी, कळब, अंबा आणि होळ या गावांना जोडणाऱ्या मार्गावरील ९.५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी रुंदीकरणासह सुधारणा करण्यात येणार आहे. या कामासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा रस्ता सुधारण्यासाठी प्रदीर्घ काळापासून मागणी होत होती. त्याचप्रमाणे, अंबाजोगाई तालुक्यातील नागापूर, साकूड ते अंबाजोगाई या दरम्यानच्या



१५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचेही रुंदीकरण व सुधारणा करण्याचे काम अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आले असून त्यासाठी १५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद देखील करण्यात आली आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी या कामांसाठी संबंधित विभागांकडे सातत्याने मागणी लावून धरली होती. या दोन्ही कामांची एकूण लांबी २४.५० किलोमीटर असून, राज्य महामार्ग आणि मुख्य जिल्हा मार्ग अंतर्गत ▶▶ पान २ वर

## २१ कोटींची माता-बालसंगोपन

# इमारत साडे ३ वर्षांपासून धुळखात-डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्हा रुग्णालयाच्या ३६० खाटांच्या विस्तारीकरणासाठी ३०४ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला. मात्र प्रत्यक्षात बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात सुमारे २१ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेली माता व बालसंगोपन इमारत गेल्या साडे तीन वर्षांपासून फर्निचर, अग्निरोधक यंत्रणा, लिफ्ट आदींसाठी आवश्यक निधी न मिळाल्याने धुळखात पडून असून अद्याप कार्यान्वित करण्यात आलेली नाही, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दिली. या इमारतीसाठी केवळ १० कोटी रुपयांच्या निधीअभावी काम रखडलेले असतानाही शासनस्तरावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. डॉ. ढवळे यांनी सहकाऱ्यांसमवेत गेल्या तीन वर्षांपासून शासन दरबारी निवेदने देत तसेच विविध आंदोलनांद्वारे तत्कालीन पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि जिल्हा



शल्यचिकित्सक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. दरम्यान, तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी इमारतीची पाहणी करून जिल्हा नियोजनमधून ३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली होती. त्या निधीतून ▶▶ पान २ वर

## महादेव मुंडे खून तपास प्रकरणी

# खोटी माहिती पसरवल्यास कायदेशीर कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात दोन वर्षांपूर्वी घडलेल्या आणि संपूर्ण राज्यभर गाजलेल्या महादेव मुंडे खून प्रकरणाच्या तपासाबाबत खोटी माहिती किंवा अफवा पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बीडच्या विशेष तपास पथकाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे. सदर प्रकरणातील तपास, विविध मानसशास्त्रीय चाचण्यांचे अहवाल व इतर तपासाशी संबंधित माहिती ही अत्यंत गोपनीय स्वरूपाची असून ती कुठेही प्रसिद्ध किंवा प्रसारित करण्यात आलेली नाही, तसेच ती प्रसारमाध्यमे किंवा सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आलेली नसल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, परळी शहरातील शरदचंद्र पवार गटाचे राजाभाऊ फड या कार्यकर्त्याने दोन दिवसांपूर्वी पत्रकार



परिषद घेऊन महादेव मुंडे खून प्रकरणात काही लोकप्रतिनिधींवर बेछूट आरोप केले होते. हे आरोप करताना ब्रेन मॅपिंग व लाई डिटेक्टर चाचणीतून पुढे आलेली माहिती आपल्याला समजली असल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यामुळे या प्रकरणात मोठी खळबळ उडाली होती. मात्र आता स्वतः पोलिसांनीच प्रसिद्धीपत्रक काढून या प्रकरणात स्पष्ट खुलासा केल्याने अशा प्रकारची माहिती अधिकृतपणे कोणालाही देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे खोटी माहिती ▶▶ पान २ वर



# संपादकीय

## तोंडाला पाने पुसली


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केला. राज्याच्या राजकारणात पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्प सादर केला. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मुख्यमंत्र्यांनी ही धुरा सांभाळली. मुख्यमंत्र्यांनी या अर्थसंकल्पातून विविध घोषणांचा पाऊस पाडला आहे. महत्त्वाचे म्हणजे ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतक-यांना २ लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मुख्यमंत्र्यांनी जाहीर केली. त्याशिवाय महिलादिनाआधीच लाडक्या बहिणींसाठी आणि लखपती दीदींसाठी महत्त्वाची घोषणा केली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अशीच सुरू राहणार असून या योजनेसाठी आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आली आहे. मात्र या योजनेच्या माध्यमातून महिलांना मिळणा-या लाभामध्ये कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. अर्थसंकल्पात 'लखपती दीदी'बाबतही भाष्य करण्यात आले असून महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सुमारे ३७ लाख दीदी झाल्या आहेत. आणखी २५ लाख बहिणींना 'लखपती दीदी' करण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्र्यांनी एकल महिलांच्या कल्याणासाठीही मोठी घोषणा केली आहे. सध्या राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू असून ते पूर्ण झाल्यानंतर त्याचे योग्य विश्लेषण करून एकल महिलांच्या कल्याणासाठी सुयोग्य धोरण आणले जाईल. राज्यातील शेतकरी, शेतमजूर, महिला आणि तरुणांसाठी विविध घोषणा करण्यात आल्या आहेत. शेतक-यांच्या कर्जमाफीबाबत सरकारने पात्र शेतक-यांसाठी २ लाखापर्यंत कर्जमाफी करण्याची घोषणा केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत कर्जाची थकबाकी असलेल्या पात्र शेतक-यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा करण्यात आली आहे. जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात अशा शेतक-यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येईल. ३० लाखांहून अधिक शेतक-यांना हवामान, बाजारभावाची माहिती देण्यात येत आहे. शेतक-यांसाठी ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. १ कोटी ३१ लाख 'फार्मर आयडी' फेब्रुवारीपर्यंत झाले आहेत. चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात होणार आहे. राज्याचे नवे गुंतवणूक धोरण जाहीर करण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघु केंद्र स्थापन केले जातील. त्यामुळे ५० लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. प्रधानमंत्री सौर योजनेअंतर्गत रूफ टॉप सोलर बसवले जाणार आहेत. बांबू विकास प्रकल्प वाढवला जाणार आहे. गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजुरांचा सहभाग असणार आहे. हा अर्थसंकल्प बळिराजाला केंद्रस्थानी ठेवून करण्यात आला असून शेती क्षेत्रातील आधुनिकता आणि शेतक-यांची सुरक्षा याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेचा विस्तार करण्यात आला आहे. २०४७ पर्यंत स्वच्छ ऊर्जेचे उद्दिष्ट गाठण्याचे ध्येय आहे. मुख्यमंत्री सौर ऊर्जेसाठी ३२ हजार ७५६ कोटींचा खर्च झाला आहे. यंदा देखील २० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय भाषणात मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेती अर्थव्यवस्था मजबूत करणे आणि शेतक-यांचे आर्थिक ओझे कमी करणे हा सरकारचा प्रमुख उद्देश आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना ही या अर्थसंकल्पातील सर्वांत महत्त्वाच्या घोषणांपैकी एक मानली जात आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्राचा विकास दर हा ९.१ टक्के राहील असा सुधारित अंदाज होता. मात्र तो ३.४ टक्के एवढाच असेल असे आर्थिक पाहणी अहवाल सांगतो. सरासरी १०९ टक्के पाऊस होऊनही कृषी क्षेत्राच्या विकास दरात ५.४ टक्के घसरण झाली. राज्याच्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्र व संलग्न क्षेत्राचा वाटा पाहता ही बाब सरकारने अत्यंत गांभीर्याने घेऊन याबाबत अर्थसंकल्पात ठोस पावले उचलत शेतक-यांना दिलासा देण्याबरोबरच अवकाळी, गारपीट, अतिवृष्टी या दुष्टचक्रातून शेतक-याला बाहेर कसे काढता येईल यावर विचार करायला हवा होता. मात्र सरकारने याकडे अर्थसंकल्पात साफ दुर्लक्ष केले आहे. अर्धवट अथवा तुटपुंजी कर्जमाफी हेच मलम वापरण्यात सरकारने धन्यता मानली आहे. नाही म्हणायला ५ लाख हेक्टरवर नैसर्गिक शेतीचे उद्दिष्ट जाहीर करत त्यासाठी अभियान राबविण्याची घोषणा सरकारने केलीय पण संकटात असलेला शेतकरी अशा शेतीकडे वळण्यासाठी कसा धजावेल याचे ठोस उपाय मात्र गुलदस्त्यातच आहेत. अर्थसंकल्पात कल्याण-लातूर मार्गासाठी संरेखनास मंजुरी देण्यात आली आहे. १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असणा-या गावांना कांक्रीट रस्त्याने जोडले जाणार आहे. चिकलठाणा विमानतळ ते वाळूज उन्मत रस्त्याचे काम दोन टप्प्यात पूर्ण केले जाणार आहे. शिरूर-छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड रस्त्याच्या प्रकल्पास निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.पैनगंगा-वैतरणा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कर्करोग-मधुमेह-हृदयविकार रुग्णांसाठी ४५०० कोटी रुपयांची प्रगती योजना आखण्यात आली आहे. अवयव प्रत्यारोपणासाठी २२ लाखापर्यंतचे अर्थसा दिले जाणार आहे. महात्मा फुले योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. बीडमध्ये ३६० खाटांचे रुग्णालय, दरे येथे निसर्गोपचार केंद्र आणि अंबाजोगाई शासकीय महाविद्यालयात एकत्रिकरण प्रकल्प राबवला जाणार आहे. एकंदरीत मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस पाडला आहे. केवळ तोंडाला पाने पुसली गेली आहेत.

### बीड जिल्हा पोलीस दलाच्या वार्षिक तपासणीत

# आयजी वीरेंद्र मिश्र यांच्याकडून कामकाजाचा आढावा

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी बीड जिल्हा पोलीस दलाची वार्षिक तपासणी पूर्ण केली असून, या दोन दिवसीय दौऱ्यात त्यांनी जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेसह विविध शाखांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. दि. ६ आणि ७ मार्च रोजी झालेल्या या तपासणीदरम्यान त्यांनी पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर संचलन आणि विविध प्रात्यक्षिकांचे निरीक्षण केले. पोलीस दलातील शिस्त आणि गुन्हे तपासातील कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांचे निराकरण केले. तसेच पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या 'परिवर्तन' या उपक्रमाच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण यावेळी करण्यात आले.



शनिवारी पोलीस मुख्यालयात आयोजित समारंभ कवायतीमध्ये पीटी परेड, लाठी कवायत, शस्त्र कवायत आणि दंगा काबू प्रात्यक्षिके सादर करण्यात आली, ज्याची विशेष पोलीस महानिरीक्षकांनी प्रशंसा केली. यानंतर झालेल्या गुन्हे आढावा बैठकीत त्यांनी गेवराई पोलीस ठाण्याने दुचाकी चोरीचे रॅकेट उद्ध्वस्त केल्याबद्दल पोलीस निरीक्षक किशोर पवार आणि त्यांच्या पथकाचा, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक बंटेवाड व त्यांच्या सहकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. गुन्हे तपासात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देत, त्यांनी तपासातील त्रुटी दूर करण्यासाठी आणि दोषसिद्धीचे प्रमाण वाढवण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (-ख) चा प्रभावी वापर करण्याच्या सूचना सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्ह्यातील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि जनसंपर्क वाढवण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सुरू केलेल्या 'प्रकल्प संवाद', 'समाधान ४८' आणि 'पोलीस आपल्या बांधावर' यांसारख्या विविध समाजोपयोगी उपक्रमांचे मिश्र यांनी विशेष कौतुक केले. सन २०२५ मधील तणावपूर्ण परिस्थिती हाताळताना बीड पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि उत्कृष्ट कामगिरीची माहिती देणाऱ्या 'परिवर्तन' पुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. या वार्षिक तपासणीमुळे पोलीस दलातील त्रुटी दूर होण्यास आणि आगामी काळात अधिक कार्यक्षमतेने काम करण्यास मदत होणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# येडेश्वरी साखर कारखान्याचा गाळप हंगाम १० मार्चला होणार बंद

### उर्वरित उसाबाबत शेतकऱ्यांना तातडीने कारखान्याशी संपर्काचे आवाहन

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव सारणी येथील येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट्स लि.या साखर कारखान्याचा चालू गाळप हंगाम दि.१० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बंद करण्यात येणार असल्याची अधिकृत माहिती कारखाना प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस अद्याप गाळपासाठी बाकी आहे, त्यांनी तातडीने कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधून कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व सदस्य तसेच बिगर सदस्य ऊस उत्पादकांनी चालू गाळप हंगाम २०२५-२६ साठी कारखान्याकडे उसाची नोंद केली होती. नोंद झालेल्या बहुतांश उसाचे गाळप पूर्ण झाले असून उर्वरित उसाबाबत शेतकऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचा नोंद केलेला ऊस गाळपाअभावी शिल्लक राहिला असेल त्यांनी १० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत कारखान्याकडे ऊस पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच नापिकी, रस्त्याची अडचण किंवा इतर कारणांमुळे ऊस तोड होऊ शकली नसेल, अशा शेतकऱ्यांनी स्वतः ऊस तोड व वाहतूक करून कारखान्याकडे पाठवावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, कारखाना बंद होण्यापूर्वी ऊस गाळपासाठी न पाठविल्यास शिल्लक राहिलेल्या उसाबाबत कारखाना प्रशासन जबाबदार राहणार नाही तसेच त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित सर्व ऊस उत्पादकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन कारखान्याच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

## पान १ वरून

### इराण-इस्त्रायलच्या...

नागरिंका सिलिंडर गॅस ९२० रुपयांना घ्यावा लागणार आहे. दरम्यान हॉटेल, रेस्टॉरंट आणि लहान व्यावसायिकांसाठी वापरल्या जाणाऱ्या १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीत देखील ११५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. यामुळे मुंबईत व्यावसायिक सिलेंडरचे दर १७२०.५० रुपयांवरून १८३५ रुपये रुपयांवर पोहोचले आहेत. याचबरोबर सर्वसामान्यांचे हाल रोखण्यासाठी केंद्र सरकारने कमर्शियल एलपीजीचा पुरवठा थांबवण्याचा निर्णय देखील घेतला आहे. सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून कमर्शियल वापराच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठ्यावर तात्पुरता ब्रेक लावला आहे. यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्रीत खळबळ उडाली असून हा उद्योग ठप्प होण्याची शक्यता आहे.

### ७२ कोटीचा निधी...

२ कोटी रुपये यांसह मतदार संघातील विविध रस्त्यांच्या कामासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकी दरम्यान मतदारांना दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करण्यासाठी आपण कटिबध्द असल्याची प्रतिक्रिया देऊन गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी निधीच्या उपलब्धते बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिणी पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, संबंधित विभागांचे मंत्री आणि महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहे. या निधीतील मंजुर कामे अतिशय दर्जेदार करून घेण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. मतदार संघातील उर्वरित कामांनाही मंजुरीसह निधीच्या उपलब्धते बाबत आपण सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले आहे.

### रस्त्यांच्या सुधारणेसाठी...

ही विकासकामे पूर्ण केली जाणार आहेत. या रस्ते सुधारणेमुळे ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ होणार असून स्थानिक व्यापार आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासाठी मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आमदार नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

### खोटी माहिती पसरवल्यास...

देऊन अफवा पसरविणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे परळी शहर, जि. बीड येथे गुन्हा क्र. १९१/२०२३, भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध दिनांक २२ ऑक्टोबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक (डखढ), बीड यांच्या मार्फत सुरू आहे. तपासादरम्यान काही संशयित इसमांच्या पॉलीग्राफ (लाई डिटेक्टर), इएजड / ब्रेन मॅपिंग तसेच व्हॉईस ॲनालिसिस अशा मानसशास्त्रीय चाचण्या करण्यात आलेल्या आहेत. या चाचण्यांचे अहवाल अत्यंत गोपनीय स्वरूपाचे असून ते तपास यंत्रणेकडे सुरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. हे अहवाल कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस, प्रसारमाध्यमांना किंवा सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आलेले नसल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अलीकडे या प्रकरणाबाबत विविध माध्यमांतून तसेच सोशल मीडियावरून अप्रमाणित माहिती व अफवा पसरवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणीही खोटी माहिती प्रसारित करत असल्यास त्यांच्यावर कायदेशीर तरतुदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. दरम्यान, सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक, बीड यांच्यामार्फत योग्य पद्धतीने व पारदर्शक कायदेशीर प्रक्रियेनुसार सुरू असून तपासाच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची सखोल पडताळणी करण्यात येत आहे, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## पान १ वरून

### इमारत साडे ३ वर्षापासून...

काही कामे पूर्ण झाली; मात्र इमारत पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी अजूनही सुमारे ७ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून अद्याप निधी मंजूर करण्यात आलेला नाही, असे डॉ. ढवळे यांनी सांगितले. यामुळे ३६० खाटांच्या रुग्णालयासाठी जाहीर करण्यात आलेल्या ३०४ कोटी रुपयांच्या निधीच्या घोषणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून ही केवळ बोलून मोकळं होण्याची घोषणा असून बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात असल्याची प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी व्यक्त केली. बीड जिल्हा रुग्णालयाची सध्याची इमारत अपुरी पडत असून त्याच ठिकाणी सोनोग्राफी व एक्स-रे विभाग कार्यरत आहेत. दररोज सुमारे ४०० हून अधिक रुग्ण तपासणीसाठी येतात; मात्र व्हरांड्यात केवळ १५ ते २० रुग्णांसाठीच बसण्याची व्यवस्था असल्याने गर्भवती महिलांना ताटकळत उभे राहावे लागते. आयपीडी विभागातही गर्दी वाढल्याने उपचारात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करून माता-बालसंगोपन रुग्णालयाची इमारत कार्यान्वित करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

### स्वारातीला...

या पार्श्वभूमीवर, अंबाजोगाई येथील ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या वैद्यकीय संस्थेच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी विशेष 'बृहद आराखडा' (चरींशी झश्ररप) तयार करण्यात आला आहे. राज्यातील विविध जिल्हा आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणाची कामे वेगाने सुरू असून, ग्रामीण भागातील जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने आवश्यक तो सर्व निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. या निर्णयामुळे मराठवाड्यातील आरोग्य व्यवस्थेला मोठी उभारी मिळणार आहे.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# काम दमदार पण प्रसिद्धीपासून लांब...

## विविध क्षेत्रातील महिलांची फिनिक्स गगनभरारी ; जागतिक महिला दिनानिमित्त १२ मार्चला आष्टी तालुका युवा पत्रकार संघ राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार देऊन करणार गौरव...

**महिलादिन विशेष**

**आष्टी । प्रतिनिधी**

समाजात काम करत असताना आपलं काम अन् आपण असा मनात निश्चय करून गेल्या अनेक वर्षापासून कुठलीही अपेक्षा न करता आपल्या क्षेत्रात दमदारपणे काम करून फिनिक्स पक्षाप्रमाणे आकाशात गगनभरारी घेऊन आपल्या कर्तत्वचा ठसा उमटविला. एक महिला असून ही आपले एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या आष्टी तालुक्यातील जिगरबाज व कर्तृत्ववान महिलांचा गुरूवार दि १२ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी पंचायत समिती येथील सभागृहात सकाळी ११ वाजता आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार देऊन गौरव व सन्मान करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याला मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले आहे. शहरात व ग्रामीण भागात विविध क्षेत्रात काम करून महिला नेहमीच पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून 'हम भी किसीसे कम नही' हे अनेक वेळा महिलांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. महिला ही जगात प्रत्येक क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत मग ते क्षेत्र राजकीय असो किंवा शैक्षणिक औद्योगिक, सामाजिक असो किवा प्रशासकीय असो शेतीशी निगडीत असो. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. अशाच काही महिलांचा ज्या प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून पडद्या मागची भूमिका दमदार पणे पार पाडत आहेत. या पुरस्कार सोहळ्याला महानंद मुंबई महासंघाच्या संचालिका प्राजक्ताताई सुरेश धस या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, पोलिस उपविभागीय अधिकारी बाळकृष्ण हानपुडे, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, सातारा जिल्हा शिवसेना (शिंदे गट) संपर्क प्रमुख रेश्माताई जगताप, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, नायब तहसीलदार अश्विनी पडोळे, नायब तहसीलदार तथा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी बाळदत्त मोरे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, ग्रामीण रुग्णालय अधिक्षक डॉ रामदास मोराळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश तांदळे, महावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, डॉ प्रियंका सिंघण, गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे, नगराध्यक्षा बेग मिर्झा आयशा इनायतुल्ला, मुर्शदपूर ग्रामपंचायतीच्या सरपंच शालिनी अशोक मुळे, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका तथा सरपंच वंदना परिवत गायकवाड यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्याला जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, संघटक समीर शेख, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, प्रा निसार शेख, ड किशोर निकाळजे,, संतोष नागरगोजे, प्रेम पवळ, सोपान पगारे, संतोष तांगडे, संतोष दाणी, बा म पवार, राजेश राऊत, विठ्ठल राख, अतुल जवणे, सय्यद बबलू, आदिनाथ ठोंबरे, मारूती सत्रे, ओंकार कदम, संस्कार लाड, किरण शिनगिरे, सचिन पवार, अतुल जाधव आदी परिश्रम घेत आहेत.




### राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्काराने यांचा होणार सन्मान

1) महंत राधाताई महाराज (आईसाहेब) आदर्श किर्तनकार व समाज प्रबोधनकार महासांगवी संस्थान पाटोदा
२) सुशिला साहेबराव चव्हाण आदर्श माता पुरस्कार मुर्शदपूर आही
२) डॉ. आम्रपाली मोहिते आदर्श समाज सेविका पुणे
४) कु. श्रावणी आजिनाथ दळवी खेळाडू १९ वर्षीय महाराष्ट्र महिला क्रिकेट रुईनालकोल
५) डॉ. स्नेहा विशाल हरकर आदर्श डॉक्टर कड़ा
६) डॉ. सुपर्णा देशमुख आदर्श प्राध्यापिका / लेखिका कड़ा
७) डॉ. सिमा सतिष काटकर आदर्श समाज सेविका वडापुरी ता. इंदापूर
८) मुश्रीना जावेद शेख आदर्श सरपंच शेडाळा ता. आही
1) अड. सारिका बाळासाहेब कुलकर्णी आदर्श विधिज्ञ पुरस्कार बीड
10) रेणुका चैतन बराडे / सानप आदर्श सामाजिक कार्यकर्ती अहिल्यानवर
11) उझमा सलीम शेख आदर्श पोलीस अधिकारी आती
12) निकिता बाबासाहेब पोकळे आदर्श बास्केट बॉल खेळाडू कडा
12) प्रज्ञा सुभाष मुनेचर आदर्श ग्रामपंचायत अधिकारी भाळवणी / हाजीपूर
14) आशा वैजनाथ फड आदर्श लेखिका शेवगाव
15) प्रियंका सचिन विधाते आदर्श प्राचार्य आष्टी (सियाज प्री. स्कुल)
16) सुविद्या विशाल चौधरी आदर्श लेखिका / शिक्षिका झगडेवाडी ता. दौंड
17) कांचन प्रमोद आहेर / विश्वे महिला आरोग्यस्वस्थ नारी पुरस्कार
18) रेखा संतोष कणसे आदर्श कर्तृत्वान माता वटणवाडी
१९) भक्ती गणेश गिरी शिवचरित्रकार कासली ता. आष्टी
२०) सुनिता गंगाधर वेढे आदर्श ग्रामपंचायत अधिकारी सावलखेड
२१) राजश्री शिंदे आदर्श कलाकार पुणे
२२) सिनाज सिकंदर शेख आदर्श शिक्षिका आष्टी
२३) प्रियंका महेश टांगळ / फसले आदर्श अभियांत्रीकी दौलावडगाव
२४) प्रिया मागेश होळकर आदर्श अंगणवाडी सेविका धानोरा
२५) संगिता भानुदास जाधव आदर्श शिक्षिका आश्रमशाळा सुरुडी
२६) ज्योत्सना शारदाबाई मुसळे आदर्श ग्राममहसूल अधिकारी वाळुंज
२७) म्हसोबा महिला शेतकरी बचत गट आदर्श महिला गट धारोडी ता. आष्टी
२८) उज्वला केशवराव थोडें आदर्श सहाय्यक कृषी अधिकारी जळगाव
२९) मुग्धा भैरवनाथ काशीद आदर्श कवी कुटुंबाडी ता. माढा जि. सोलापूर
30) डॉ. मेधा संतोष हा आदर्श सामाजिक कार्यकर्ती अहिल्यानगर
31) सरिता मारुती जगताप आदर्श महिला संगीत विशारद अहिल्यानगर
3२) सुनिता जनक पोकळे / शिंदे आदर्श महिला तबला संगीत विशारद अलंकार आही
33) स्वाती नानासाहेव पोकळे आदर्श महिला ग्रामसखी बेलगाड
3४) सुरेखा बबन सदाफुले आदर्श महिला आरोग्य सेविका मातकुळी
3५) सायली अनंत चौधरी व आदा प्राध्यापिका आष्टी
3६) सुवर्णा मछिंद्र गावडे आदर्श महिला आशा वर्कर कन्देवडगाव
२७) सुमित्रा कल्याण काळे आदर्श महिला महसूल सेवक आष्टी
3८) अलका बाबुराव ससाणे आदर्श महिला सुपरवायझर धामणगाव
3९) श्रावणी सोमनाथ पवळ उत्कृष्ठ चंग ब्युटी मेकअप आर्टिस्ट कडा
४0) रुपाली तुकाराम डोवो आदर्श महिला लाईनमन बानोरा
४1) सिमाबेगम जावेद सय्यद आदर्श महिला उद्योजिका मुर्शवपुर
४२) अस्मिता अतुल सुरवसे आदर्श महिला गायिका बीड या विविध क्षेत्रातील महिलांचा गुरूवारी सकाळी 11 वाजता आष्टी पंचायत समिती सभागृहात महिला दिनानिमित्ताने शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून राज्यस्तरीय 'नारी सन्मान २०२६' हा पुरस्कार देऊन आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गौरव करणार आहे.

# आंतरराष्ट्रीय महिला दिन : स्त्रीशक्तीचा गौरव आणि समानतेच्या प्रवासाची प्रेरणादायी कहाणी

दरवर्षी ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो . हा दिवस केवळ उत्सवाचा नसून समाजातील स्त्रियांच्या योगदानाचा गौरव करणारा , त्यांच्या हक्कांसाठी लढलेल्या संघर्षाची आठवण करून देणारा आणि भविष्यातील समानतेच्या वाटचालीची दिशा दाखवणारा दिवस आहे . यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता असे प्राचीन भारतीय संस्कृतीत म्हटले गेले आहे . म्हणजे ज्या समाजात स्त्रियांचा सन्मान होतो , त्या समाजात समृद्धी आणि प्रगती नांदते . म्हणूनच महिला दिन हा केवळ एक दिनविशेष नसून सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा प्रेरणादायी क्षण आहे .

स्त्री ही केवळ कुटुंबाची आधारवड नाही तर समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीची मुख्य शक्ती आहे . आई , बहीण , पत्नी , शिक्षिका , डॉक्टर , शेतकरी , वैज्ञानिक , अधिकारी , उद्योजिका अशा अनेक भूमिकांमध्ये स्त्रिया आज समाजाला दिशा देत आहेत . घर सांभाळणारी स्त्री म्हणजे समाज घडवणारी शक्ती असे म्हटले जाते . भारतीय संस्कृतीत स्त्रीला देवीचे रूप मानले जाते . दुर्गा , लक्ष्मी , सरस्वती या देवतांच्या रूपातून शक्ती , समृद्धी आणि ज्ञानाचे प्रतीक स्त्री आहे .

आंतरराष्ट्रीय महिला दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

महिला दिनाची सुरुवात सामाजिक न्यायाच्या आंदोलनातून झाली . १९व्या आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीला जगभर महिलांनी कामगार हक्क , समान वेतन आणि मतदानाचा अधिकार यासाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलन केले . १९०८ मध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात हजारो महिलांनी कामगार हक्कांसाठी मोर्चा काढला . त्यानंतर १९१० मध्ये डेन्मार्कच्या कोपनहेगन येथे आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत महिला दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला .१९११ मध्ये प्रथमच काही युरोपीय देशांमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला . नंतर हा दिवस जगभर पसरला . संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ साली महिला वर्ष घोषित केले आणि त्यानंतर ८ मार्चला अधिकृतपणे आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून मान्यता दिली . आज हा दिवस जगातील जवळपास सर्व देशांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो .

भारतीय समाजातील स्त्रियांचे योगदान : भारतीय समाजात स्त्रियांनी प्राचीन काळापासून महत्त्वाची भूमिका बजावली आहे . वेदकालीन काळात गार्गी , मैत्रेयी यांसारख्या विदुषी महिलांनी तत्त्वज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले



. मध्ययुगीन काळात संत जनाबाई , बहिणाबाई , मुक्ताबाई यांसारख्या संत महिलांनी समाजाला आध्यात्मिक दिशा दिली . आधुनिक भारतात स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली . झाशीची राणी लक्ष्मीबाई , सावित्रीबाई फुले , कस्तुरबा गांधी , सरोजिनी नायडू , अरुणा आसफ अली यांसारख्या महिलांनी समाज परिवर्तनासाठी मोठा संघर्ष केला . सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेले कार्य भारतीय समाजासाठी ऐतिहासिक ठरले .

उठा जागा आणि शिक्षण घ्या हा संदेश देत त्यांनी स्त्री शिक्षणाची क्रांती घडवली . म्हणूनच सावित्रीबाई फुले यांना भारतातील पहिली महिला शिक्षिका मानले जाते .

महाराष्ट्रातील स्त्रीशक्तीचा वारसा : महाराष्ट्राची सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा स्त्रीशक्तीच्या कार्याने समृद्ध झाली आहे . संत बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते . अहिल्याबाई होळकर यांनी न्यायप्रिय आणि लोकाभिमुख प्रशासनाचे उदाहरण घालून दिले . रमाबाई रानडे यांनी महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे कार्य केले .

आजही महाराष्ट्रात महिला बचत गट चळवळ मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे . ग्रामीण भागातील हजारो महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन प्राप्त केले आहे . थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीप्रमाणे छोट्या बचतीतून मोठे आर्थिक परिवर्तन घडताना दिसते .

ग्रामीण भागातील महिलांची भूमिका : ग्रामीण भारतात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे . शेतातील काम , पशुपालन , घरगुती उद्योग , कुटुंब व्यवस्थापन अशा अनेक जबाबदाऱ्या महिला पार पाडतात . आईच्या हातचा घास म्हणजे प्रेमाची चव असे म्हणतात . कुटुंबाच्या संगोपनात आणि संस्कारांमध्ये आईचे योगदान अमूल्य असते . बीड , मराठवाडा आणि ग्रामीण महाराष्ट्रात महिलांनी शेती , लघुउद्योग , स्वयंरोजगार यामध्ये मोठे योगदान दिले आहे . अनेक महिला आज शेती व्यवस्थापन , दुग्धव्यवसाय , हस्तकला उद्योग यामध्ये यशस्वी होत आहेत .

आधुनिक काळातील महिला सक्षमीकरण : आजच्या काळात महिला शिक्षण , तंत्रज्ञान , विज्ञान , प्रशासन , राजकारण , क्रीडा अशा सर्व क्षेत्रांमध्ये मोठी झेप घेत आहेत . कल्पना चावला , सुनीता विल्यम्स , पी . व्ही . सिंधू , मेरी कोम , किरण बेदी , निर्मला सीतारामन यांसारख्या महिलांनी जगभरात भारताचे नाव उज्ज्वल केले . तंत्रज्ञानाच्या युगात महिलांसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत . डिजिटल शिक्षण , ऑनलाईन व्यवसाय , स्टार्टअप्स , ई-कॉमर्स यामध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे . ग्रामीण भागातही महिलांनी मोबाईल तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवहार स्वीकारले आहेत .

महिलांसाठी शासनाच्या योजना : भारत सरकार आणि राज्य सरकार महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवत आहेत . उदाहरणार्थ : बेटी बचाओ बेटी पढाओ,

उज्ज्वला योजना ,महिला बचत गट योजना , स्वयंसहाय्यता गट अभियान ,मातृत्व लाभ योजना , लाडकी बहीण योजना इ.

या योजनांमुळे महिलांचे शिक्षण , आरोग्य , आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सुरक्षा वाढत आहे .

नारी तू नारायणी , शक्ति का रूप महान , तेरे बिना अधूरा है यह सारा संसार .

ही भावना स्त्रीच्या सामर्थ्याची जाणीव करून देते .

शिक्षण आणि स्त्री सक्षमीकरण : शिक्षण हेच खरे सामर्थ्य असे म्हटले जाते . मुलींचे शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे . शिक्षित महिला संपूर्ण कुटुंब आणि समाजाला दिशा देते . म्हणूनच आज अनेक शाळा , महाविद्यालये आणि सामाजिक संस्था महिला शिक्षणावर विशेष भर देत आहेत . ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे , शिष्यवृत्ती योजना , वसतिगृहे आणि डिजिटल शिक्षण यामुळे परिस्थितीत सकारात्मक बदल होत आहे . समाजातील आव्हाने : महिला सक्षमीकरणाची वाटचाल सुरू असली तरी काही सामाजिक आव्हाने अजूनही अस्तित्वात आहेत . बालविवाह , शिक्षणातील असमानता , आरोग्य समस्या , आर्थिक अवलंबित्व यांसारख्या समस्यांकडे समाजाने संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे . महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे आणि सामाजिक जागरूकता दोन्ही महत्त्वाचे आहेत . जिथे स्त्री सुरक्षित , तिथे समाज समृद्ध हा विचार प्रत्यक्षात आणणे ही आजची गरज आहे .

सांस्कृतिक आणि साहित्यिक दृष्टिकोन : भारतीय साहित्य आणि लोकपरंपरेत स्त्रीचे महत्त्व अनेक कवितांमध्ये आणि गीतांमध्ये दिसते .

स्त्री म्हणजे प्रेमाचा झरा ,
स्त्री म्हणजे जीवनाचा आधार ,
तिच्या कष्टांनी उभा संसार ,
तिच्या शक्तीने उजळतो संसार .

महिला दिनाचे सामाजिक महत्त्व : आंतरराष्ट्रीय महिला दिन हा समाजातील सकारात्मक बदलाची प्रेरणा देतो . या दिवशी महिलांच्या कार्याचा गौरव केला जातो , त्यांच्या समस्यांवर चर्चा होते आणि समानतेच्या दिशेने समाजाला प्रेरणा मिळते . शाळा , महाविद्यालये , शासकीय कार्यालये , सामाजिक संस्था येथे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात . महिला सन्मान सोहळे , चर्चासत्रे , आरोग्य शिबिरे , उद्योजक मेळावे अशा उपक्रमांमुळे महिलांना प्रोत्साहन मिळते .

भविष्याचा मार्ग : महिला सक्षमीकरण हे केवळ महिलांचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे . पुरुष आणि महिला दोघांनीही समानतेच्या भावनेने समाज घडवणे आवश्यक आहे . शिक्षण , आरोग्य , रोजगार आणि सामाजिक सन्मान या चार आधारस्तंभांवर महिला सक्षमीकरण उभे राहते . एक हाताने टाळी वाजत नाही या म्हणीप्रमाणे समाजातील सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न केल्यासच समानतेचे स्वप्न साकार होईल .

आंतरराष्ट्रीय महिला दिन हा स्त्रीशक्तीच्या गौरवाचा दिवस आहे . इतिहासातील संघर्ष , वर्तमानातील प्रगती आणि भविष्याची आशा या सर्वांचा संगम या दिवशी दिसतो . स्त्री ही समाजाच्या प्रगतीची प्रेरणा आहे . तिच्या शिक्षणात , आरोग्यात आणि सन्मानात गुंतवणूक करणे म्हणजे राष्ट्राच्या भविष्यामध्ये गुंतवणूक करणे होय .

स्त्री ही केवळ घराची नव्हे तर संपूर्ण जगाची निर्माती आहे ही भावना मनात ठेवून महिला दिन साजरा करणे हीच खरी समाजसेवा आहे . आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने समाजातील प्रत्येक स्त्रीला सन्मान , समानता आणि सुरक्षिततेचा अधिकार मिळावा हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे .

▸▸ **चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

# स्त्री एक प्रेरणा



यत्र नार्यस्तु पूज्यंते, तत्र रमन्ते देवता... असे म्हणतात की, जिथे महिलांचा सन्मान केला जातो, तिथे स्वयं देवांचा वास असतो.

प्रथमतः सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा. महिलांना स्वतंत्र मिळवून देण्याचे धाडस पुरुषवर्गाने अत्यंत सहज सोपे केले. तिला सर्व क्षेत्रात आघाडीवर ठेवले. व्यवसाय, राजकारण, घरातील स्वतंत्र, नोकरी या सारख्या गोष्टीत आपला महिला वर्ग अतिशय उत्तम रित्या यशस्वी आहे. याचा नक्कीच अभिमान राहील. परंतु, सध्याच्या घडामोडी पाहता जास्तच स्वतंत्र प्राप्त झाले आहे असे वाटते. इंटरनेट चे जाळे आणि सोशल मीडिया च्या दिखाऊ दुनियेतकाही महिला संस्कृती पासून, घर् नाते संबंधापासून, मुलांपासून भरकटत जाताना दिसत आहे. तर काही अपडेटेड महिला सोशल मीडिया चा योग्य वापर करून आपली ओळख निर्माण करत आहेत. महिलांनो, मुलीनों धावपळीच्या युगात तुम्ही स्वतःला वेळ द्या, मुलांना योग्य संस्कार, मार्गदर्शन द्या, स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या, हेल्थ चेकअप करा, तुमची अर्धवट राहिलेली स्वप्ने जपा, आणि काही महिलांच्या डिग्री जर इन्कम्प्लिट असतील तर त्या पूर्ण करा. तुमच्या पंखाना बळ देऊन ऊंच भरारी नक्की घ्या. आणि व्यसनाधीन कुटुंबाला नक्कीच हिमतीने बाहेर काढा. नारी खूप सशक्त असते, आता बघा ना! स्त्री पुरुषासाठी व्रत/ उपवास ठेवू शकते, पण स्त्री साठी अजून एकपण असा उपवास/व्रत नाही, कारण स्त्री ला घडविताना देवाने एक सशक्त, प्रबळ इच्छाशक्ती असणारी देवी म्हणूनच घडविले आहे.

जिचं संपूर्ण आयुष्यच अडचणीने भरलेलं आणि प्रेरणेने रेखाटलेले आहे, अशी बहुमूल्य शक्ती म्हणजेच स्त्री.

स्वतःचा सन्मान करा, योग्य मार्ग वापरून आजकाल ची मुले् मुली घडवा कारण त्या पिढीतच उद्याची जिजाऊच्या लेकीआणि शिवबाचे मावळे म्हणून घडतील. महिला दिवस हा आज पुरताच नाही,कारण बाईचं अस्तित्व प्रत्येक दिवशीच खास असतं. पुन्हा एकदा माझ्या सर्व प्रिय मैत्रिणींना उमलून येण्यासाठी, आनंदी जीवन नवीन उमेदीने जगण्यासाठी, क्रांती घडविण्यासाठी बळ मिळो आणि जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

▸▸ **सौ. रचनाताई अतुल नहार**
**वडवणी. बीड**

# महिलांवर वाढते अत्याचार आणि साजरे होणारे महिला दिन




८ मार्च हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केला जातो, त्यांच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण केली जाते आणि समाजात महिलांना समान स्थान मिळावे यासाठी विविध कार्यक्रम घेतले जातात. परंतु दुसऱ्या बाजूला पाहिले तर महिलांवर होणारे अत्याचार अजूनही चिंताजनक प्रमाणात वाढताना दिसतात. त्यामुळे महिला दिन साजरा करताना आपण समाजातील या कठोर वास्तवाकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. आजच्या आधुनिक आणि प्रगत समाजात महिलांनी शिक्षण, विज्ञान, राजकारण, क्रीडा, उद्योग अशा अनेक क्षेत्रांत मोठे यश मिळवले आहे. तरीसुद्धा अनेक महिलांना घरगुती हिंसा, छेडछाड, लैंगिक अत्याचार, हुंडाबळी आणि सामाजिक भेदभाव यांना सामोरे जावे लागते. काही ठिकाणी महिलांना अजूनही समान संधी दिल्या जात नाहीत. ही परिस्थिती समाजासाठी लज्जास्पद आहे. महिला दिनाच्या निमित्ताने आपण महिलांचा सन्मान करतो, त्यांना फुले देतो, कार्यक्रम आयोजित करतो ; पण केवळ एक दिवस साजरा करून महिलांच्या समस्या संपणार नाहीत. खरे तर महिलांचा सन्मान आणि सुरक्षितता वर्षातील प्रत्येक दिवशी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने महिलांबद्दल आदराची भावना ठेवली पाहिजे.

महिलांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी कठोर कायदे, त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. मुलांना लहानपणापासूनच स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार दिले पाहिजेत. शिक्षण, जागरूकता आणि सामूहिक प्रयत्न यांच्या मदतीनेच महिलांसाठी सुरक्षित आणि सन्माननीय समाज निर्माण होऊ शकतो. शेवटी असे म्हणता येईल की, महिला दिन साजरा करणे महत्त्वाचे आहे ; परंतु त्यामागील खरा उद्देश म्हणजे महिलांना सुरक्षित, सन्मानित आणि समान हक्क असलेला समाज देणे हा असला पाहिजे. जेव्हा महिलांवर होणारे अत्याचार पूर्णपणे थांबतील, तेव्हाच महिला दिन साजरा करण्याचा खरा अर्थ पूर्ण होईल.

▸▸ **शबनम मुजीब खान**
**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार दि. ०८ मार्च २०२६ •

# भ्रष्टाचाराचा जाब विचारणाऱ्या शिवसेना तालुकाप्रमुखावर प्राणघातक हल्ला



**तालुक्यात खळबळ**

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील (MGNREGS) भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणारे शिवसेना (शिंदे गट) शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख हरिभाऊ शेळके यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात हरिभाऊ शेळके गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्रमुख मागण्या:

या घटनेनंतर शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट असून प्रशासनाकडे खालील मागण्या करण्यात आल्या आहेत:

दोषींवर कठोर कारवाई: हल्ला करणाऱ्या ज्ञानेश्वर हाडूळे याच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी.

भ्रष्टाचाराची चौकशी: एमआरजीएस अंतर्गत झालेल्या ६५ ते ७० लाखांच्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी व्हावी.

पोलीस कर्मचाऱ्याची चौकशी: आरोपीचा भाऊ सिद्धेश्वर हाडूळे याची नियुक्ती कोणत्या आधारावर झाली आणि तो पदाचा गैरवापर करत आहे का, याची पोलीस अधीक्षकांनी (SP) चौकशी करावी.

या प्रकरणाची माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी गांभीर्याने दखल घेऊन न्याय द्यावा, अशी मागणी पीडित हरिभाऊ शेळके आणि ग्रामस्थांनी केली आहे.

## थोडक्यात...

### पवन बालाजी जोगदंड , बुद्धभूषण ताजणे, कराटे युनिव्हर्सिटी राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड




**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान धुळे या ठिकाणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेर रायगड विद्यापीठ यांच्या अंतर्गत श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालय धुळे या ठिकाणी राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड चाचणी संपन्न झाली या स्पर्धेमध्ये पवन बालाजी जोगदंड याने -७५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला तर बुद्धभूषण संजय ताजने याने काता या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळून राष्ट्रीय स्पर्धा आपले स्थान निश्चित केले आहे. भोपाळ या ठिकाणी सतरा ते वीस मार्च यादरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता पवन बालाजी जोगदंड तसेच बुद्धभूषण ताजणे या दोन्ही खेळाडूने आपले स्थान निश्चित केले आहे वरील खेळाडू सेन्साई उत्तरेश्वर जगन्नाथ सपाटे यांच्या मार्गदर्श लाभले. बीड जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी पवन जोगदंड यांनी नितीनियम सराव करत आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर तसे , रेवनाथ शेलार सर , अनिकेत काळे सर, पाटील सर , कालिदास हसुरकर सर , जितू सर, सतीश राठोड सर, योगेश करंडे सर , मोसिन शेख , जालिंदर इंगळे वरील माननीय वराने खेळाडूंचे अभिनंदन केले व भोपाळ या ठिकाणी होणारे राष्ट्रीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

### विनायक बप्पा मुळे यांच्या वाढदिवसानिमित्त मदत व सामाजिक उपक्रम







**वडवणी । प्रतिनिधी**

शेतकरी पुत्र, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे यांच्या वाढदिवसा निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा वडवणी येथे विद्यार्थी यांना शालिय साहित्य, खाऊचे वाटप तसेच केंडेपिंपरी (पुनंदगाव ) येथील सतीश कोके यांचे काही दिवसापूर्वी अपघाती निधन झाले आसता काल दिनांक ०७/०३/२०२६ शनिवार रोजी त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन पर भेट घेऊन त्यांच्या कुटुंबीयांना केंडेपिंपरी चे सरपंच संजय धपाटे तसेच वडवणी तालुका शिवसेना, युवासेना यांच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली या वेळी उपस्थित शिवसेना जिल्हा सहसचिव युवराज मामा शिंदे, सरपंच संजय धपाटे,नवनाथ मोरे, उपसरपंच प्रकाश महाराज काटकर,विद्यार्थी सेना तालुका प्रमुख अजय खांडवे,अविनाश बोंद्रे, परमेश्वर नागवे, विनोद मुळे, प्रकाश वजीर, रमेश मामा कुरे, बाबा मामा कुरे, सर्जेराव राठोड, महेश गायकवाड, दत्ता धपाटे, विलास राठोड, दादा खांडवे, माऊली कुरे सह उपस्थित. त्यांच्या पश्चात कुटुंबामध्ये पत्नी सह एक मुलगा दोन भाऊ आहेत.

## महसूल सेवा गावपातळीवर; शेतकरी-नागरिकांचे प्रश्न जलद सोडवण्यावर भर: आ.सुरेश धस

**छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानाचा आष्टी येथे शुभारंभ**

**बीड । प्रतिनिधी**




आष्टी-ग्रामीण भागातील नागरिकांना छोट्या-छोट्या कामांसाठी तालुक्याच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत,महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न गावपातळीवरच मार्गी लागावेत या उद्देशाने राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानाचा शुभारंभ आष्टी तालुक्यातील आष्टा (ह.ना.) महसूल मंडळात आमदार सुरेश धस यांच्या हस्ते शनिवार (दि.७) रोजी करण्यात आला.

यावेळी बोलताना आ. धस म्हणाले की,या अभियानाच्या माध्यमातून शेतकरी व नागरिकांचे महसूल विभागाशी संबंधित प्रश्न मंडळ व तलाठी स्तरावर जलदगतीने सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. डिजिटल सेवांच्या माध्यमातून ७/१२, ८-अ उतारे, तसेच उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रे शक्यतो एकाच दिवशी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न प्रशासनाने करावा. राज्य सरकार शेतकरी, शेतमजूर व गोरगरीबांच्या हिताचे निर्णय सातत्याने घेत असून या अभियानामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.या अभियानांतर्गत भोगवटदार वर्ग दोन जमिनींचे वर्ग एकमध्ये रूपांतर, प्रलंबित फेरफार प्रकरणे, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील अर्ज निकाली काढणे, आधार अपडेट, जन्म प्रमाणपत्र देणे, गरोदर मातांसाठी किट वाटप तसेच दिव्यांग प्रमाणपत्र अशा विविध सेवा नागरिकांना स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच शेतरस्ते व पानंद रस्त्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारी तातडीने निकाली काढाव्यात, अशा सूचनाही आ. धस यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी घोडे, उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसिलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार पांडूरंग माढेकर, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, बाल विकास प्रकल्प अधिकारी बेलेकर, अमरराजे निंबाळकर, मंडळाधिकारी राजकुमार आचार्य यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

यावेळी तहसिलदार वैशाली पाटील यांनी उपस्थित नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानाची सविस्तर माहिती देत नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## तलवाड्यात मोठा गाजावाजा करत राबवलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात नागरिकांची भ्रमनिराशा!




**तलवाडा । प्रतिनिधी**

तालुक्यातील तलवाडा येथे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने मोठा गाजावाजा करत आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक - १ आज दिनांक ७ मार्च रोजी राबवन्यात आले. परंतु हा कार्यक्रम शासनाच्या धोरणानुसार ज्या उद्दिष्टाने राबवने अभिप्रेत होते. त्या आणुषंगाने या ठिकाणी उपस्थिति दर्शविना-या गरजु नागरिक व महिलांची मोठ्या प्रमाणावर निराशा पदरी पढल्याचे या वेळी दिसुन आले. ज्यांच्या कडे तलवाडा येथील कार्यक्रमाची जबाबदारी आली होती. त्यांना या कार्यक्रमातुन अर्थिक लाभ तो काय होणार म्हणुन की काय या ठिकाणच्या शिबिरात काम घेऊन येणा-यांना चक्क तहसीलला या आसे सांगन्यात आल्याचे या वेळी नागरिकांनी सांगितले. या शिबिरात कार्यक्रम स्थळीच काही समस्यांचे निराकरण होणार होते मात्र उपस्थितिंपैकी एका दोघांचे प्रश्न निकाली काढुन ईतर उपस्थितांच्या हाती मात्र भोपळा दिल्याची चर्चा कार्यक्रम स्थळी ऐकावयास मिळाली.. शिबिरातील मुख्यतः निर्णय घेण्यात येतील असे शासनाच्या वतीने सांगितले होते. परंतु थातुर माथुर कार्यक्रम पार पाढुन या भागातील नागरिकांच्या हाती शेवटी निराशाच.



*वडवणी येथील विठ्ठल बहिरे यांची कन्या चि.सौ.का.श्रुती व चि.लक्ष्मीकांत यांच्या विवाह प्रसंगी शुभेच्छा देताना पिएसआय शाम गायकवाड , सरपंच भागवत गव्हाणे,पत्रकार अविनाश मुजमुले, पत्रकार जगदीश गोरे, पत्रकार संभाजी लांडे, अतुल राऊत, ज्ञानेश्वर यादव, वसंतराव बहिरे,तुळशिराम अंबुरे आदी उपस्थित मान्यवर होते.*

## नराधमांनी महिनाभरात तीनदा विकले, चोथ्या लग्नाच्या भीतीने विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**चौघांवर गुन्हा**

**आष्टी । प्रतिनिधी**

माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना उघडकीस आली असून, एका २१ वर्षीय विवाहितेची केवळ आर्थिक लाभासाठी एकाच महिन्यात तीन वेगवेगळ्या ठिकाणी विक्री करून तिचे बळजबरीने लग्न लावून देण्यात आले. या सततच्या मानवी तस्करी आणि मानसिक छळाला कंटाळून पीडितेने नैराश्यातून विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. या गंभीर प्रकरणी आष्टी पोलिसांनी पुणे आणि तुळजापूर येथील चार संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून संपूर्ण जिल्ह्यात या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. लातूर येथील रहिवासी असलेल्या या पीडित तरुणीचा पहिला विवाह दोन वर्षापूर्वी झाला होता. मात्र पतीच्या वर्तणुकीमुळे ती माहेरी राहत होती. याच काळात तिची भेट हडपसर येथील महानंदा नावाच्या एजंटशी झाली. महानंदाने दुसरे लग्न लावून देण्याचे आमिष दाखवून पीडितेला पुण्याला नेले आणि तेथे ५ लाख रुपये घेऊन अमर कालभोर नावाच्या व्यक्तीशी तिचे बळजबरीने लग्न लावून दिले. अवघ्या दहा दिवसांतच तिला तिथून काढून दुसऱ्या एका व्यक्तीला साडेचार लाख रुपयांत विकण्यात आले. या नराधमांचा लग्नाचा बाजार इथेच थांबला नाही. महानंदाने तुळजापूर येथील एका महिलेच्या मदतीने ४ मार्च २०२६ रोजी आष्टी तालुक्यातील कानडी बुद्रुक येथील एका व्यक्तीशी पीडितेचे तिसरे लग्न लावून पुन्हा साडेचार लाख रुपये लाटले. या छळाचा कळस तेव्हा गाठला गेला जेव्हा ६ मार्च रोजी पीडितेला पुन्हा फोन करून चौथ्या लग्नासाठी तयार राहण्यास सांगण्यात आले. वारंवार होणारी ही विक्री आणि भविष्यातील अत्याचाराच्या भीतीने पीडिता प्रचंड मानसिक दबावाखाली आली आणि तिने टोकाचे पाऊल उचलत विषारी औषध प्राशन केले. सध्या तिच्यावर मिरजगाव येथील रुग्णालयात उपचार सुरू असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

# महाराजस्व शिबिरातून शासन आपल्या दारी शिबिर एक दिवसीय नसून कायमस्वरूपी याचा लाभ घ्यावा : आमदार प्रकाश सोळंके



## नित्रुड येथील छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीरास प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

महाराजस्व समाधान शिबिरामुळे नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी वारंवार चकरा माराव्या लागणार नाहीत, तसेच महसूल विभागाशी संबंधित समस्या गावपातळीवरच सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात आला असुन महाराजस्व शिबिरातून शासन आपल्या दारी आले आहे हे शिबिर एक दिवसीय नसून कायमस्वरूपी आहे त्यामुळे याचा लाभ घ्यावा असे आवाहन मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांनी केले.

तालुक्यातील नित्रुड येथे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.१ अंतर्गत शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नित्रुड येथे आयोजित शिबिरात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके होते. तर प्रमुख उपस्थितीत युवा नेते जयसिंग भैय्या सोळके, अपर जिल्हाधिकारी अंबाजोगाई अश्विनी जिरंगे, माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे, तहसीलदार संतोष रुईकर, तालुका आरोग्य अधिकारी मधुकर घुबडे, गटविकास अधिकारी ज्योत्सना मुळीक तसेच तालुका उपअधिक्षक भूमीअभिलेख उद्धव सानप आदी उपस्थित होते.